//०९//

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.गवाणकर यांच्या मार्फत**

१०. मला दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयामध्ये श्रीधर विठ्ठल जोशी यांनी दाखल केलेल्या दाव्याची प्रत दाखविल्यास मी ओळखू शकत नाही. हे मला माहित नाही की, श्रीधर जोशी यांनी सदरचा दावा हा लक्ष्मी परशुराम कुबल यांचे वारस व इतरांविरुध्द दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मी कुबल यांना हरिश्चंद्र परशुराम कुबल, सहदेव परशुराम कुबल, दिपीका दिपक पराडकर हे वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सहदेव कुबल म्हणजे मी स्वतः आहे. माझे असे म्हणणे नाही की, ओरस येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयामध्ये स्पेशल मुकदमा नं. ४१/२०२२ मध्ये मी हजर झालो नाही व लेखी कैफियत दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, स्पेशल मुकदमा नं. ४१/२०२२ मध्ये मी हजर झालो आहे व मी त्यामध्ये माझी लेखी कैफियत दिली आहे. मी स्पेशल मुकदमा नं. ४१/२०२२ मधील दाव्याची प्रत वाचलेली आहे. मला आता नि.क्र. ५९/१ वरील दस्त दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दस्त हा स्पेशल मुकदमा नं. ४१/२०२२ मधील दाव्याची प्रत आहे. त्यास **निशाणी क्र. ६०** दिली आहे. मला स्पेशल मुकदमा नं. ४१/२०२२ या दाव्यातील मजकूर मला मान्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, स्पेशल मुकदमा नं. ४१/२०२२ या मध्ये गाव मौजे तोंडवळी येथील स.नं. ५६ हि.क्र. २/४/१ ही मिळकत समाविष्ठ आहे. मला आता नि.क्र. ६० वरील दाव्याची प्रत दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये स.नं. ५६ हि.क्र. २/४/१ ही मिळकत समाविष्ठ आहे. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ५६ हि.क्र. २/४/१ ही मिळकत कै. विठ्ठल तुकाराम जोशी यांच्याकडून आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, कै. विठ्ठल तुकाराम जोशी हे माझे व प्रतिवादीचे मुळ पुरुष होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये स.नं. ५६ हि.क्र. २/४/१ ही मिळकत समाविष्ठ केलेली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरची मिळकत ही खरेदीखताव्दारे विकत घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्पेशल मुकदमा नं. ४१/२०२२ मध्ये श्रीधर जोशी यांनी खरेदीखताला आव्हान दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे

की, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात वरील दाखल केलेल्या दाव्यामध्ये केलेले खरेदीखत वैध आहे किंवा बोगस आहे हा मुद्दा विचाराधीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील दाव्यामध्ये खरेदीखत वैध ठरल्यास मिळकत ही लक्ष्मी परशुराम कुबल यांची असल्याबाबत ठरेल अथवा खरेदीखत अवैध आहे असे ठरल्यास मिळकत ही सामाईक असल्याचे ठरेल.

प्रतिवादीतर्फे प्रस्तुतचा दावा हा वरील नमूद स्पेशल मुकदमा निर्णीत होईपर्यंत स्थगित ठेवण्याकरीता अर्ज सादर करणार असल्याचे कळविले. त्यामुळे उलट तपास तहकूब करण्याची विनंती केली. त्यानुसार उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येतो.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १२/११/२०२४

महेश रा. देवकते
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), मालवण